**महाराष्ट्र शासन**

**अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

**शासन ज्ञापन क्रमांक. ग्रासंअ-२०२५/प्र.क्र.१३६/ग्रा.सं.४**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२

दिनांक : ०५ जून, २०२६

<u>संदर्भ</u> : १. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांचे जा.क्र.राआ/महा/लेखा/ e-Jagriti /२०२५/७०१९ दि.२५.११.२०२५ रोजीचे पत्र

२.उपभोक्ता मामले, खाद्य एवं सार्वजनिक वितरण मंत्रालय, उपभोक्ता मागले विभाग, नवी दिल्ली यांचे D.O.No.J-६/७/२०२३-CPU दिनांक-१९.११.२०२५

<u>**ज्ञापन :-**</u>

भारत सरकार उपभोक्ता मामले, खाद्य एवं सार्वजनिक वितरण मंत्रालय, उपभोक्ता मामले विभाग, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र.२ मध्ये नमूद पत्रान्वये e-Jagriti platform प्रणाली मध्ये प्रकरण दाखल करण्याचे शुल्क भरण्यासाठी National Informatics Centre (NIC) यांनी शिफारस केलेल्या Bharatkosh, PayGov, Razorpay and Bildask यांच्यापैकी एका कंपनीची Payment Gateway सेवा घ्यावी आणि त्याअनुषंगाने त्या कंपनीशी MoU करावा अशा सुचना दिलेल्या आहेत.

२. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांच्याकडे CONFONET प्रणाली द्वारे प्रकरण दाखल करण्याचे शुल्क ग्रास प्रणालीद्वारे स्विकारले जात होते.परंतु आता CONFONET प्रणाली ऐवजी e-Jagriti platform प्रणाली स्विकारण्यात आल्यामुळे भारत सरकार उपभोक्ता मामले, खाद्य एवं सार्वजनिक वितरण मंत्रालय, उपभोक्ता मामले विभाग, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दिनांक-१९.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये e-Jagriti platform प्रणाली मध्ये प्रकरण दाखल करण्याचे शुल्क भरण्यासाठी National Informatics Centre (NIC) यांनी शिफारस केलेल्या Bharatkosh, PayGov, Razorpay and Bildask यांच्यापैकी एका कंपनीची Payment Gateway सेवा घेण्यासाठी दिलेल्या सूचनेप्रमाणे मान्यता देण्याबाबत राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांनी संदर्भ क्र.१ अन्वये विनंती केलेली आहे .

३. Payment Gateway साठी Bharatkosh आणि PayGov,India हे केंद्र शासनाचे platfroms/portals आहेत. यास्तव, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांना e-Jagriti platform प्रणाली मध्ये प्रकरण दाखल करण्याचे शुल्क भरण्यासाठी PayGov या कंपनीची Payment Gateway सेवा घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

४. सदर शासन ज्ञापन, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२६०६०५१३३०२४८७०६ असा आहे. हा शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=4A3B99D57D257E955ED34CA51DB1F3C521002555E05C455E86FA1C9C82A1D82B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=68D5A8ABFFDD75CBA24301AA39C12B40983F304D7267796A32B42D4D558F1A1F, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2026.06.05 13:33:01 +05'30'

**(प्रमोद पाटील)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई.

**प्रत,**

१. मा. अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई
२. महालेखापाल (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
३. प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
५. निवडनस्ती.